दैनिक लोकशाहीचा श्वास... भ्रष्टाचाराचा विनाश...

# प्रवक्ता लोकशाहीचा

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या त्याग,संघर्ष आणि लेखनीला समर्पित...

● मुख्यसंपादक- नितीन रावण मुजमुले ● मो.नं. 9673210438

बीड (महाराष्ट्र) | दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -०५ | सोमवार दि.१५ सप्टेंबर २०२५ | आरएनआय-एमएएचएमएआर/२५/ए२३८० | किंमत २ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | DAILY | MARATHI | Year-01 | Issue -05 | MONDAY DT.15 SEPTEMBER 2025 | RNI : MAHMAR/25/A2380 | PRICE - 2 RUPEES | PAGES - 4

# मराठवाडा, विदर्भात पावसाचा हाहाकार, जालन्यात ढगफुटीसदृश्य पाऊस

## गोदावरीला मोठा पूर, सोलापूरलाही पावसानं झोडपलं!

विदर्भ आणि मराठवाड्यात कालपासून झालेल्या मुसळधार आणि ढगफुटीसदृश्य पावसामुळे अनेक जिल्ह्यांमध्ये पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. नद्या-नाले तुडुंब भरून वाहत असून, अनेक भागांमध्ये नागरिकांचे स्थलांतर आणि शेतीचे नुकसान झाले आहे. चंद्रपूर, बीड, जालना, आणि बार्शीसह अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले आहे. सोलापूर जिल्ह्याला देखील मुसळधार पावसाने झोडपले आहे.

चंद्रपूर : इरई आणि वर्धा नद्यांना पूर, रहिवाशांचे स्थलांतर

चंद्रपूर शहरासह जिल्ह्यात काल रात्री जोरदार विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस झाला. आधीच पूरसदृश्य स्थितीत असलेल्या जिल्ह्यात आणखी अडचणी निर्माण झाल्या. इरई धरणाचे सातही दरवाजे एक मीटरने उघडण्यात आल्यामुळे नदीची पाणीपातळी वाढली आहे. दुसरीकडे अमरावती, यवतमाळ आणि वर्धा जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे चंद्रपूर जिल्ह्यात शिरणाऱ्या वर्धा नदीच्या पाणी पात्रात देखील मोठी वाढ झाली आहे. चंद्रपूर शहरातील रहमतनगर आणि सिस्टर कॉलनी भागात नदीचे पाणी शिरले. जवळपास ५० ते ६० नागरिकांना चंद्रपूर महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासनाच्या मदतीने सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे.

बीड जिल्ह्यात दमदार पाऊस

बीडमध्ये कालपासून जोरदार पावसाला सुरुवात झाली असून बिंदुसरा नदीसह इतर नाले तुडुंब भरून वाहत आहेत.

या पावसामुळे जरी काही प्रमाणात समाधान व्यक्त होत असले तरी खरीप पिके आणि काढणीला आलेल्या पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. शेतीचे मोठे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

जालना जिल्ह्यात ढगफुटीसदृश्य पाऊस

जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यात वडीगोद्री, गोंदी महसूल मंडळात अतिवृष्टी झाली. मांगणी नदीला पूर आल्याने नालेवाडी गावातील एक आदिवासी कुटुंब शेतात अडकले. प्रशासनाने तातडीने बचावकार्य सुरू केले असून, मदतकार्य पथक पाठवण्यात आले आहे. भांबेरी व रेणापुरी गावांचा संपर्क तुटला आहे. यामुळे परिस्थिती गंभीर होत चालली आहे.

सोलापुरात मगर दिसल्याच्या चर्चेने एकच खळबळ

सोलापुरात मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचले. याच दरम्यान अंत्रोळीकर भागात मगर आढळल्याचा एक फोटो वायरल झाला. हा फोटो -ख तंत्रज्ञानाचा वापर करून बनवलेला असल्याचं स्पष्ट झालं असून, प्रत्यक्षात कोणतीही मगर सापडली नाही. वनविभागाने नागरिकांना भीती न बाळगण्याचे आवाहन केले असून, खोटे फोटो व्हायरल करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे सांगण्यात आले आहे.

पैठण तालुक्यात गोदावरीला पूर; कुरण पिंपरीचा संपर्क तुटला

गोदावरी नदीत १.१५ लाख क्यूसेकने विसर्ग सोडल्यामुळे कुरण पिंपरी गावाचा पैठण तालुक्याशी संपर्क तुटला आहे.

मुख्य रस्ते पाण्याखाली गेले असून अनेक घरे जलमय होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



### बार्शी तालुक्यात तुफान पावसाचा फटका; शेतीचं मोठं नुकसान

बार्शी शहर आणि तालुक्यातील बेलगाव, मांडेगाव, ताडसौन्दने, शेलगाव या भागात तुफान पावसाचा फटका बसला. कांदा, उडीद, भुईमूग, सोयाबीन या पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. मुसळधार पावसामुळे शेतांचे तळ्यात रूपांतर झाले असून शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे.

### धाराशिव जिल्ह्यात मुसळधार पाऊस

धाराशिव जिल्ह्यातील कळंब, धाराशिव, उमरगा आणि लोहारा तालुक्यांमध्ये रात्रभर जोरदार पाऊस झाला. कळंब तालुक्यातील शेलगाव जहागिरी गावातील ८ ते १० घरांमध्ये पाणी शिरून संसारोपयोगी वस्तूंचे नुकसान झाले. या मुसळधार पावसामुळे सोयाबीनसह इतर पिकांचे मोठे नुकसान झाले असून, नद्या-नाल्यांना आलेल्या पाण्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

# क्रिकेटच्या मैदानावरही भारताची पाकिस्तानवर मात, ७ विकेट्सनी विजयी

नवी दिल्ली : आशिया कप २०२५ मध्ये भारतीय संघाने पाकिस्तानवर दणदणीत विजय मिळवला आहे. कोणत्याही आयसीसी स्पर्धांमध्ये १४ सामन्यात ११ वेळा मात करत भारताने आपले वर्चस्व कायम ठेवले आहे. पाकिस्तानने भारतासमोर १२८ धावांचे लक्ष्य ठेवले होते. जे भारताने १५.५ षटकांमध्ये पार केले. यामध्ये कर्णधार सुर्याकुमार यादवने वादळी ४७ धावांची वादळी खेळी केली. तसेच, अशिषेक शर्माने १३ चेंडूमध्ये ३१ धावा करत तुफान फलंदाजीचे केली. तर, तिलक वर्माने ३१ धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले.ग्रुप अ मध्ये भारताने आपले वर्चस्व कायम ठेवले असून उपांत्य फेरीचे आपले तिकीट पक्के केले आहे. दरम्यान, पाकिस्तानने पहिले फलंदाजी



करत ९ बाद १२७ धावा केल्या होत्या. याचा पाठलाग करताना भारतीय संघाने दुसऱ्या षटकात पहिली विकेट गमावली. सईम अयुबच्या चेंडूवर सलग दोन चौकार मारल्यानंतर शुभमन गिल बाद झाला. त्याने १० धावांचे योगदान दिले. यादरम्यान अभिषेक शर्माने ४ चौकार आणि २ षटकारांसह फक्त १३ चेंडूमध्ये ३१ धावा केल्या. पण, सईम अयुबने त्याला फहीम अश्रफकडून झेलबाद केले. पहिल्या ६ षटकांनंतर संघाने ६१ धावा केल्या. त्यानंतर आलेल्या तिलक वर्मा आणि कर्णधार सुर्यकुमार यादवने एक चांगली भागीदारी रचली. तिसऱ्या विकेटसाठी दोघांनी मिळून ५२ चेंडूमध्ये ५६ धावांची भागीदारी रचली.

१३व्या षटकात तिलक वर्मा बाद झाला. त्याचीही विकेट सईमने घेतली. मात्र, तोपर्यंत भारत विजयाजवळ पोहोचला होता. यावेळी सूर्याने शिवम दुबेच्या साथीने भारताला विजय मिळवून दिला. सूर्याने षटकार लगावत हा विजय मिळवून दिला. भारताने पाकिस्तानवर ७ विकेट्सनी मात केली आहे. दरम्यान, सामना संपल्यानंतर भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन केले नाही. त्याआधी नाणेफेकीनंतरही कर्णधार सूर्यकुमार यादवने पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली आगाशी हस्तांदोलन केले नाही. दरम्यान, पहलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरनंतर भारताने पाकिस्तानसोबत सामना खेळू नये, अशी मागणी विरोधकांसह पहलगाम हल्ल्यामध्ये मृत पावलेल्या पिडीत कुटुंबाची होती. मात्र, आंतरराष्ट्रीय स्पर्धा असल्याने भारताला हा सामना खेळावाच लागणार अशी भूमिका बीसीसीआय तसेच भाजप नेत्यांनी मांडली होती.

# गायरान धारकांच्या न्याय व हक्कासाठी रिपाइंचे महाधरणे आंदोलन: पप्पू कागदे

बीड/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील कसत असलेल्या गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी व गायरान धारकांना न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी जिल्हा रिपाइंच्या वतीने मंगळवार दि.२३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ठिक ११:०० वाजता बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर गायरान धारकांचे भव्य महाधरणे आंदोलन आयोजित करण्यात आहे.

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी दलित पँथरच्या माध्यमातून कसत असलेल्या गायरान जमिनी गायरान धारकांच्या नावे करण्यासाठी राज्यभर गायरान धारकांचा लढा उभा केला. कसेल त्याची जमीन राहील त्याचे घर या प्रमाणे राज्याचे समाज कल्याण मंत्री असताना १४ एप्रिल १९९० चा शासन परिपत्रक ( जी.आर) काढून कसत असलेल्या लाखो हेक्टर गायरान जमिनी गायरान धारकांच्या नावावर केल्या. आगामी काळातही कसत असलेल्या गायरान जमिनी नियमाकुल करण्यासाठी १९९० च्या शासन परिपत्रक (जी.आर.)नुसार गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. भूमिहीन गायरान धारक, शेतमजूर व उसतोड कामगार यांना प्रतिमाही ३००० रु पेन्शन (मानधन) देण्यात यावे. गायरान धारकांच्या ७/१२ व ८-अ उताऱ्यावर असणारे पोट खराब क्षेत्र काढण्यात यावे.आदी प्रमुख मागण्यांची शासन दरबारी पूर्तता करण्यासाठी मंगळवार दि.२३ सप्टेंबर २०२५ रोजी बीडच्या जिल्हाधिकारी



कार्यालयावर गायरान धारकांच्या न्याय व हक्कासाठी जिल्हा रिपाइंच्या वतीने महाधरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. अशी माहिती महाधरणे आंदोलनाचे आयोजक युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

# शेतघरातील महिलेच्या मृत्यू प्रकरणात पतीच निघाला हत्यारा

परळी वैजनाथ : परळी तालुक्यातील डाबी येथे काल दिनांक १३ रोजी सकाळच्या सुमारास शेत घरामध्ये एका गृहिणीचा रक्तरंजित मृतदेह आढळून आला होता. तिच्या मृतदेहावरील शस्त्राच्या घावांमुळे ही हत्याच असल्याचे निदर्शनास येत होते. मात्र याप्रकरणी कोणीही ठामपणे पुढे न आल्याने गुढ वाढले होते. आता या प्रकरणात मयतेच्या मुलाने फिर्याद दिली असून यानुसार मयत महिलेचा नवराच हत्यारा असल्याचे स्पष्ट झाले आहे. आरोपीला परभणी येथून पोलिसांनी अटकही केली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त अधिक माहितीनुसार, डाबी गावाजवळील आखाड्यावर असलेल्या शेतघरात मयत शोभा मुंडे या आपले पती तुकाराम मुंडे व मुलांसह राहत होत्या. मात्र पती-पत्नीमध्ये नेहमीच वाद होत असायचे. या अनुषंगाने



यापूर्वीही या महिलेने आपल्या पतविरुद्ध पोलिसात धाव घेतलेली होती. त्यानंतर सामंजस्याने पती-पत्नीतील वाद नातेवाईकांनी मिटवले होते. त्यानंतर ते सुखाने संसार करत होते.

मात्र गेल्या काही महिन्यांत त्यांच्यात पुन्हा वाद सुरु झाले व पुन्हा पहिल्यासारखीच वादावादी सुरू झाले. या वादातूनच रागाच्या भरात आरोपी पती तुकाराम मुंडे याने धारदार सुरा पोटात खूपसून शोभा हिची हत्या केली आणि घरातून निघून गेला. पती गायब असल्याने प्रथमदर्शनी त्याने तिची हत्या केल्याचा कयास बांधला जात होता. या दृष्टीने पोलिसांनी तातडीने शोध घेतला व रात्री उशिरा आरोपीला परभणी येथून अटक केली आहे. याप्रकरणी मयत महिलेच्या मुलाने फिर्याद दाखल केली असुन अधिक तपास परळी ग्रामीण पोलीस करीत आहेत.

# पान टपरी बसवताना ६ जणांना विजेचा धक्का, तीन जणांचा मृत्यू

**परभणी जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. पान टपरी बसवताना ६ जणांना विजेचा धक्का लागला असून, यामध्ये तीन जणांचा मृत्यू झाला आहे. तर तीन अत्यवस्थ आहेत. परभणीच्या पालम मधील बालाजी नगर इथं ही घटना घडली आहे. या घटनेमुळं परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.**

परभणीच्या पालममधील बालाजी नगर येथील शेख शफीक शेख मुसा यांची पान टपरी होती. त्यांनी ती बैलगाडीतून घरी आणल्यानंतर खाली उतरण्याचा प्रयत्न सुरू




केला, तेव्हा टपरी घसरुन बैलगाडीवरील लोखंडी दांडी विजेच्या तारेला लागली. यात काम करणारे सिद्धार्थ नरहरी बावळे, शेख शफीक शेख मुसा व शेख शौकत शेख मुसा या तीन जणांना विजेचा तीव्र धक्का बसला. या तिघांना तत्काळ उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. या अपघातात शेख फरहान शेख महेबूब, शाकेर शेख व शेख असलम शेख गुड्डू हे तिघे जखमी झाले आहेत. त्यांच्यावर सध्या साई हॉस्पिटल, लोहा येथे उपचार सुरू आहेत. या दुर्दैवी घटनेमुळे पालम शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

संपादकीय

# जरा विसावू या वळणावर

जगभरात आता 'स्लो लिव्हिंग'बद्दल बोललं जातंय. अनेकजण त्या वाटेवर चालूही लागलेत. माफक आणि पर्यावरणपूरक वस्तूंमध्ये अर्थपूर्ण जगणं, पर्यावरणाची काळजी घेणं, टिकाऊ विकासावर भर देणं हेही त्यात आलं. या चळवळीचा मुख्य हेतूच संथ आणि अर्थपूर्ण जगणं हा आहे.

'हा माझ्या सोसायटीमधील स्विमिंग पूल आहे ज्यात मी कधीच पोहत नाही, मीच काय कोणीच पोहत नाही. मी दिवस उगवायला जातो, रात्री उशिरा येतो. आणि हेच माझं आयुष्य आहे' एका व्हिडीओत एक तरुण पुरुष स्विमिंग पूल, उंच इमारती दाखवत बोलत होता. 'या उंच बिल्डिंगमध्ये घरं घेण्यासाठी माझ्यासारखंच लोकांनी प्रचंड कर्ज काढलं आहे. कदाचित एखादी गाडी पण घेतली असेल त्यांनी लोनवर. आणि ते फेडण्यासाठी ते रात्रंदिवस काम करतात. त्यांच्याकडे जगण्यासाठी वेळच नाहीये. ज्याच्यासाठी माणूस धावतो आहे ते त्याला जगता येत नाही. भारतातच नव्हे तर जगातल्या अनेक देशांची हीच अवस्था आहे. माणूस रिकामा शून्य नाहीच, सतत काहीतरी भरणं सुरू आहे.

नुकतंच महाराष्ट्र शासनानं खासगी कामाच्या ठिकाणी कामाचे बारा तास केले. महागाई, नोकऱ्या नाहीत, स्पर्धेत टिकायचं आहे म्हणून कसंतरी काम सुरू होतं, घरासाठी, स्वत:साठी आधीच वेळ देता येत नव्हता; त्यात आता बारा तासांची ड्युटी. खासगी क्षेत्रात काम करणारे (स्त्री)पुरुष आता अधिक यांत्रिक आयुष्य जगू लागतील. यात जगण्यासाठी काम केलं जात नसून कामासाठी जिवंत राहणं होत आहे.

ही पुरुषांची स्थिती. स्त्रिया आधीच घरकाम, मुलं, नोकरी करण्यासाठी बारा वाजता झोपून पाच वाजता उठत होत्या, आता स्त्रियांना झोपच मिळणं अशक्य आहे. अशी ड्युटी आहे म्हणून अनेकींना नोकरीवर पाणी सोडावं लागेल हे वेगळं. लहान मुलांची आयुष्यंही अपेक्षांच्या ओझ्यांनी दबली गेल्यानं त्यांनाही तणावाला सामोरं जावं लागत आहे.

भारतात काम आणि जगणं याचं संतुलन असणं, कुटुंबाला किंवा स्वत:साठी वेळ देणं ही माणसाची मुलभूत गरज आहे, असं कामाच्या ठिकाणचं वातावरण नाही. माणूस घरी आणि कामाच्या ठिकाणी आनंदी राहिला तर तो अधिक उत्पादन, नवनिर्मिती करू शकते हे शासनाच्या, कार्पोरेट संस्कृतीच्या ध्यानात येत नाही. नियोजनबद्ध कामाच्या कमी तासांतही जास्त उत्पादन होतं हे सत्य आहे, हे जगात आठवड्याचे कमी कामाचे तास असणाऱ्या देशांनी दाखवून दिलं आहे. शिवाय ज्या देशात कामाचे कमी तास आहेत ते देश आनंदी देशांच्या यादीत वरच्या स्थानावर आहेत आणि भारतासारखे जे 'डबल ड्युटी', रविवारी, ऑफिस संपल्यावरही काम करणारे कर्मचारी जास्त कमिटेड असतात,' असं म्हणणारे देश आनंदी देशांच्या यादीत तळाशी असतात.

एक पुरुष बीपी वाढला म्हणून डॉक्टरकडे जातो. डॉक्टर त्याला उपाय म्हणून गाणी ऐकणे, सिनेमे पाहणे, काहीही न करता वेळ घालवणे, चित्रे काढणे, फिरायला जाणे, व्यायाम करणे, सुटी घेऊन गावी जाणे, मुलं आणि बायकोसोबत वेळ घालवणे हे उपाय आणि होमवर्क देतात. यातल्या गोष्टी करण्यासाठी त्या पुरुषाला आयुष्याचं घड्याळ बदलावं लागतं. एकच दिवस सुट्टी असणाऱ्या रविवारीही 'काय करावं'हा प्रश्न पडणाऱ्या त्याला 'काहीच न करता' नीरव शांततेत स्वत:ला शोधणं अवघड जातं. या उदाहरणातल्या पुरुषासारखे स्वत:सोबत आणि कुटुंबासोबत काय करावं, हे न कळणारे अनेकजण आहेत. सतत मोबाइलमध्ये रील्स स्क्रोल करत आयुष्य ढकलणं सुरू आहे.

माणूस काम सोडलं तर सगळ्यात जास्त वेळ कुणासोबत घालवू लागला तर तो मोबाइलसोबत. अशानं तो एकलकोंडा होऊन सगळ्यांत असूनही एकटा आहे. मूल मोबाइलसोबत जन्म घेत आहे, मोबाइलशिवाय त्याला न जेवता येतं, ना नवीन काही शिकता येतं. पालकांना मुलांच्या आनंदापेक्षा करिअर महत्त्वाचं झालं आहे. एकमेकांना वेळ देता येत नाही म्हणून जोडप्यात संवाद नाही, संवाद नाही म्हणून वाद वाढून घटस्फोट होत आहेत. कुटुंबं, नाती डिसफंक्शनल झाली आहेत. आज समाजात बहुतेक कुटुंबांची अशीच अवस्था आहे.

'आई, तुला माहिती आहे ुरपीं/इच्छा आणि पशशव/गरजमध्ये फरक आहे. आपण पशशव काय आहेत, यावर फोकस करायला हवं. आपल्या पशशवी कमी असतात,ुरपीं जास्त असतात. आम्हाला शाळेत शिकवलं आज,' दुसरीतलाला कबीर शाळेतून आल्या आल्या सांगत होता. दर्जेदार जगण्याच्या कल्पनाही बदलल्या आहेत. भारंभार घेत राहणं या संस्कृतीमुळे माणसाचं मन, मेंदू, घर नको असलेल्या घटकांनी भरलेली अडगळ झाली आहे. आपल्याकडे एकेमकांच्या जुन्या वस्तू देणं, वापरणं फारसं रुजलेलं रुचलेलं नाही.


भारतात जागतिकीकरणाचं वारं वाहण्याआधी माणूस अर्थपूर्ण जगण्यावर, नात्यांना जपण्यावर, मूल्यांवर भर देत होता. आपण जो प्रत्येक श्वास घेतो आहोत, तो जाणवण्याइतपत जगण्यात सजगता होती. ग्रामीण भागातच नव्हे तर शहरातही दिवस उगवलेला नि मावळतीला गेलेला जाणवायचा. गावाकडं पायाला लगडलेल्या पायवाटा, मातीचा गंध, झाडांच्या साली, फुलांचे सुवास, रुतणारे काटे, माळरानावरील क्षितीज आणि आरवणारे कोंबडे नजरेस पडायचे. माणसाला त्याची नजर कुठवर जाते हे लक्षात यायचं. आता सूर्य अंगावर येत नाही म्हणून विटामिन डीथ्रीच्या गोळ्या खाव्या लागतात. हे फक्त भूतकाळात रमणं नव्हे, तर सुटून गेलेलं दर्जेदार जगणं आहे, जे हळुवार संथ होतं, ज्याला आता 'स्लो लिव्हिंग' असा शब्द वापरला जातो आहे.

जगभरात सध्या 'स्लो लीव्हिंग'बद्दल बोलणं, त्यानुसार वागणं सुरू झालं आहे. स्लो लिव्हिंग चळवळीची सुरुवात १९८० च्या दशकात इटलीमध्ये झाली. नवीन उघडलेल्या मॅकडोनल्डच्या दुकानाला विरोध करण्यासाठी कार्लो पेट्रनी आणि सहकाऱ्यांनी स्लो फूड चळवळ उभी केली, ज्यात पारंपरिक साधं अन्न खाण्यावर भर होता. ही चळवळ जवळजवळ १५० देशांत पसरली आहे. त्यानंतर ही चळवळ स्लो वर्किंग, स्लो प्रवास, स्लो पालकत्व अशा अनेक विभागात विस्तारली. अत्यंत माफक आणि पर्यावरणपूरक वस्तूंमध्ये अर्थपूर्ण जगणं, पर्यावरणाची काळजी घेणं, टिकाऊ विकासावर भर देणं हेही त्यात आलं. या चळवळीचा मुख्य हेतू संथ आणि अर्थपूर्ण जगणं हा आहे. 'लिव्ह बेटर नॉट फास्टर' असं या चळवळीचं ब्रीद आहे.

सतत कशाच्यातरी मागे धावण्यापेक्षा, शांत आणि ठरवून जगण्यावर माणसं भर देऊ लागली आहेत. कुणी आवडीचा छंद जोपासत आहे तर कुणी आपली बकेट लिस्ट पूर्ण करत आहे, कुणी एक वर्ष कमावून पैसे साठवून जग फिरायला जात आहे, तर कुणी शहरातील उंच इमारती सोडून जमिनीत पाय मळवायला गावी जाऊन राहत आहे. कुणी मिनिमलिस्ट बनून कमीत कमी गरजांत आनंदानं जगत आहे, तर कुणी कामाच्या तासांच्या व्यतिरिक्त काम करण्यास नकार देत आहे, कुणी जुन्या मित्र मैत्रिणी, नातेवाईकांना भेटण्यात, वेळ घालवत आहे. स्लो लिव्हिंगमध्ये होय म्हणायला शिकणं, नकार देणं, भावनिक वा शारीरिक दबाव झुगारणं हेही येतं. 'जिंदगी बडी नही, लंबी होनी चाहिये' म्हणत रोजचा दिवस आनंदात घालवण्यावर लक्ष देत आहे. आपण कित्येक दिवस झाले, स्वत:शी शांतपणे बोललो आहे का, इतरांना जे म्हणायचं आहे ते ऐकलं आहे का, यावर विचार होतो आहे. स्वत:च्या शरीराला, मनाला प्रेमानं कधी न्याहाळलं आहे का, हा प्रश्न स्वत:ला विचारत आहेत.

घरातील नातेसंबंधातील समस्या, स्वत:बद्दलच्या अपेक्षा पूर्ण न झालेली पन्नाशीच्या आसपास असणारी स्त्री मानसोपचार तज्ज्ञाकडे गेल्यावर 'तुला काय केल्यावर बरं वाटणार आहे, तू आनंदी होणार आहेस?' असा प्रश्न विचारल्यावर नवऱ्याचं प्रमोशन, मुलांचं करिअर याबद्दल बोलू लागल्यावर तिला मध्येच थांबवून त्यांनी विचारलं, 'या दुसऱ्यांबद्दलच्या गोष्टी झाल्या. तुझं स्वप्न काय आहे?' असं विचारल्यावर तिला स्वत:साठी स्वप्नं बघायला हवीत, हे नव्यानं कळलं. पितृसत्ता झुगारून स्वतंत्र आनंदी आयुष्य जगणं स्त्रीसाठी आव्हान आहे. तरी स्वत:वर प्रेम करणं, व्यायामाला वेळ काढणं, ब्रेक घेऊन फिरणं, प्रसंगी लग्न, मातृत्व नाकारून किंवा आहे त्या व्यवस्थेत स्वत:साठी जागा करून स्वप्नांवर लक्ष देणं या गोष्टी स्त्रियाही करत आहेत.

## जायकवाडी धरणाचे आपत्कालीन दरवाजे उघडले..गोदावरी नदीला पुर



अहिल्यानगर/ प्रशांत बाफना
जिल्हा प्रतिनिधी

गोदावरी नदीच्या खोऱ्यात व जायकवाडी धरणाच्या वरच्या धरण साखळी पट्यात मोठ्याप्रमाणात पाऊस झाल्याने जायकवाडी धरणातून एक लाख १५ हजार क्युसेक्स विसर्ग सुरू..काल दिवसभर व रात्रभर सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जायकवाडी धरणाचे नियमित १८ दरवाजासह आपत्कालीन नऊ दरवाजे असे एकूण २७ दरवाजे तब्बल तीन फुटाने उघडली असून गोदावरी नदीपात्रात एक लाख पंधरा हजार क्युसेक्स इतका विसर्ग सुरू करण्यात आला आहे. जायकवाडी धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये तसेच नाशिक नगर जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जायकवाडी धरण नाथसागर जलाशयाची पाणी पातळी झपाट्याने वाढली असून सध्या धरण १००% भरले आहे. धरणात येणारी पाण्याची आवक एक लाखापेक्षा जास्त असून सुरू असलेल्या पावसामुळे गोदावरीत सोडण्यात येणारा विसर्ग दीड लाखापेक्षा जास्त जाऊ शकतो असा इशारा देण्यात आला आहे..

गोदावरी नदीकाठच्या गावकऱ्यांनी सतर्क रहावे असा इशारा जायकवाडी धरण प्रशासन पाटबंधारे विभागाने दिला आहे..

## सम्राट चौकात रिक्षा चालकावर जीवघेणा हल्ला

### मोबाईल चोरीच्या संशयावरून मारहाण

बीड (प्रतिनिधी) : शहरातील सम्राट चौकात मोबाईल चोरीच्या संशयावरून एका रिक्षाचालकाला ८ ते १० जणांच्या टोळक्याने जबर मारहाण केल्याची धक्कादायक घटना शनिवारी (१४ सप्टेंबर) रात्री उघडकीस आली. या हल्ल्यात रिक्षाचालक गंभीर जखमी झाला असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे. विशेष म्हणजे, या घटनेला तब्बल १४ तास उलटून गेल्यानंतरही शिवाजीनगर पोलिसांनी कोणतीही गुन्हा नोंद केली नसल्याचा गंभीर आरोप पीडिताकडून करण्यात आला आहे. जखमी रिक्षाचालक शेख समीर शेख नझीर (रा. अजमेर नगर, बालेपीर, बीड) हा सम्राट चौक ते अंबिका चौक या मार्गावर रिक्षा चालवून उदरनिर्वाह करतो. शनिवारी रात्री साडेआठ ते नऊच्या सुमारास तो सम्राट चौकात रिक्षा उभी करून मित्राला भेटण्यासाठी थांबला असताना, ८ ते १० जणांचा गट अचानक त्याच्यावर तुटून पडला. माझ्या मित्राचा मोबाईल चोरी केला आहे असे म्हणत त्याच्यावर बेदम मारहाण करण्यात आली. या मारहाणीमुळे शेख समीर बेशुद्ध झाला.



घटनास्थळी उपस्थित काही नागरिकांनी त्याला तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी त्याच्या डोक्याला तीन टाके घालण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले असून शरीरावरही गंभीर मार लागल्याचे स्पष्ट झाले आहे. या घटनेबाबत शेख समीरने आरोप केला आहे की, शिवाजीनगर पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविण्यासाठी गेल्यानंतरही पोलिसांनी गुन्हा नोंदवण्यास टाळाटाळ केली. परिणामी नागरिकांमध्ये पोलिस प्रशासनाविरोधात नाराजीचे वातावरण आहे.

या मारहाणीच्या घटनेने शहरात खळबळ उडाली असून पीडिताला न्याय मिळावा, दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.

## ओबीसीत एकही नकली समाविष्ट होणार नाही; चिंता करू नका



पुणे : मराठा समाजाला कुणबी जात प्रमाणपत्र देण्याबाबत सरकारचा तो जीआर ओबीसींवर गदा आणणारा नाही. ज्यांच्याकडे कुणबी नोंदी आहेत त्यांनाच प्रमाणपत्र मिळणार आहे, बिना नोंदींचे कोणालाही प्रमाणपत्र मिळणार नाही. त्यामुळे ओबीसी समाजाने चिंता करण्याची गरज नाही. एकही नकली व्यक्ती ओबीसीमध्ये समाविष्ट होणार नाही. याची काळजी त्या जीआरमध्ये घेण्यात आलेली आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

फडणवीस म्हणाले, मला असं वाटतं की जोपर्यंत दोन्ही समाजांतील नेते खरी वास्तविकता काय आहे? हे समाजापर्यंत पोहोचवणार नाहीत तोपर्यंत दोन्ही समाजांतील तेढ कमी होणार नाही. मी सांगतो की ज्यांच्याकडे कुणबी नोंदी आहेत, त्यांनाच कुणबी प्रमाणपत्र मिळेल, कुणबी नोंद नसेल तर कुणबी प्रमाणपत्र मिळणार नाही.

प्राध्यापकांची ८० टक्के पदे लवकरच भरणार

प्राध्यापक पद भरतीच्या प्रक्रियेवरून अडचणी होत्या. राज्यपालांनी ही भरती पारदर्शक पद्धतीने व्हावी. त्यासाठी प्रक्रियेत बदल सुचविले होते. आता लवकरच प्राध्यापकांची ८० टक्के रिक्त पदे लवकरच भरली जातील असे फडणवीस यांनी सांगितले.

## परळी लोकन्यायालयात प्रकरणे ६६ प्रकरणे तडजोडीने निकाली



परळी (प्रतिनिधी)


परळी तालुका विधी सेवा समिती व परळी वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाणी व फौजदारी तथा विविध बँका पतसंस्था महावितरण इत्यादी संस्था यांचे प्रकरणे सामंजस्याने व तडजोडीने निकाली काढण्यात आली. दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या या लोक अदालतीत दाखल पूर्व २५ व दाखल प्रकरणे मिटले ४१ मिळून ६६ प्रकरणे निकाली निघाली आणि एकूण रक्कम वसुली ९७ लाख ५० हजार १०४ रुपयांची बँक पतसंस्था यांची वसुली झाली आहे .सदर लोकन्यायालयात पंच परळी न्यायालयाचे न्या डि आर बोर्डे न्या डि वाय रायरीकर ड मोहन कराड ड बुद्धरत्न उजगरे यांनी काम पाहिले. सदर लोक न्यायालय यशस्वी करण्यासाठी न्या परळी वकील संघाचे अध्यक्ष ड एच व्ही गुट्टे ड आर.व्हि.गित्ते अँड प्रदिप गिराम ड आर व्हि देशमुख ड मिर्झा मंजुर अली ड.माधवराव मुंडे ड वैजनाथ नागरगोजे ड दिलीप स्वामी ड प्रभाकर सातभाई ड वसंतराव फड उपाध्यक्ष ड दस्तगीर सचिव ड शेख शकीक ड डि.एल.उजगरे.ड

नागापूरकर ड जीवनराव देशमुख ड अनिल मुंडे ड गजानन पारेकर ड लक्ष्मीकांत मुंडे ड डि.पी.कडबाने ड विलास बडे ड लक्ष्मण अघाव ड उषा दौंड ड कल्याण सटाले ड मार्तंड शिंदे ड लक्ष्मण गित्ते ड जगन्नाथ आंधळे ड ज्ञानोबा मुंडे ड सुनिल सोनपीर ड दिनकर वाघमोडे ड दत्ता कराड ड आबा सोळंके ड केशव अघाव ड अर्जुन सोळंके ड शाकेर सय्यद ड सुल्तान सहाय्यक अधीक्षक गिरीधर जोशी हाश्मी गणेश कलशेटे बडगिरे लघुलेखक सचिन गुप्ता सुंदर मुंडे अमित गजबार कृष्णा कळसदकर सचिन कळसकर जयराम गंगणे अविनाश चौधरी शेख अर्शद सह वैद्यनाथ बँकेचे वसुली अधिकारी राहुल गोपणपाळे व इतर बँकाचे अधिकारी तथा परळी पोलीस वाहतूक शाखेचे अधिकारी तथा कर्मचारी ईत्यादी

## दै. मराठवाडा साथी चे संपादक आदरणीय सतीशजी बियाणी यांच्या दु:खद निधनाने पत्रकारितेच्या क्षेत्राला मोठा धक्का

परळी (प्रतिनिधी)

दै. मराठवाडा साथी चे ज्येष्ठ संपादक, मनमिळावू व प्रगल्भ व्यक्तिमत्व असलेले सतीशजी बियाणी यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठवाड्यातील पत्रकारिता, समाजकार्य आणि सांस्कृतिक क्षेत्रावर शोककळा पसरली आहे. सतीशजी बियाणी हे केवळ संपादक नव्हते तर समाजातील घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवून जनतेपर्यंत सत्य व निष्पक्ष बातम्या पोहोचविणारे निर्भीड पत्रकार होते. त्यांनी आपल्या लेखणीद्वारे समाजातील ज्वलंत प्रश्नांना नेहमीच वाचा फोडली.



त्यांचे व्यक्तिमत्व अतिशय आत्मीय व मनमिळावू होते. प्रत्येकाशी जिव्हाळ्याने संवाद साधणे, प्रोत्साहनाचे दोन शब्द देणे, आणि आपलेपणा निर्माण करणे हा त्यांचा स्वभाव होता. मी स्वत: २७ ऑगस्ट २०२५ रोजी माझ्या वाढदिवशी त्यांचा फोन आला होता, त्यांनी मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या आणि दै. मराठवाडा साथी मध्ये माझ्या विषयी लेख छापून मला आत्मिक आनंद दिला होता.

सतीशजींची आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण जडणघडण म्हणजे त्यांची धार्मिक निष्ठा. दररोज ते श्री वैद्यनाथ प्रभूंच्या मंदिरात दर्शनाला जात असत. त्या वेळेस आमचा नेहमी नमस्कार व्हायचा. त्यांच्या या अध्यात्मिक श्रद्धेने त्यांच्या व्यक्तिमत्वात आणखी माधुर्य आणले होते.समाजातील विविध घटकांना एकत्र आणणे, पत्रकारितेतून सकारात्मक बदल घडवणे, वाचकांचा विश्वास जपणे या त्यांच्या वाटचालीमुळे मराठवाडा साथी हे नाव घराघरात पोहोचले.

त्यांच्या निधनाने पत्रकारितेतील एक प्रभावी आवाज कायमचा हरपला आहे. त्यांचे मार्गदर्शन, आपुलकी आणि समाजहिताचा विचार करण्याची वृत्ती ही सदैव प्रेरणादायी ठरेल.सामाजिक कार्यकर्ते शिवकुमार केदारी, हिंद नगर, परळी वैद्यनाथ यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करताना सांगितले की, सतीशजींच्या आठवणी सदैव प्रेरणादायी राहतील. त्यांचा आत्मीय स्वभाव व समाजहिताची तळमळ नेहमी स्मरणात राहील.सतीशजी बियाणी यांच्या आत्म्यास शांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना. त्यांच्या स्मृती समाजमनात सदैव जिवंत राहतील.

## नाफेड,एफ.सी.आय.आणि सी.सी.आय.यांनी शेतीमालाची खरेदी बाजार समितीच्या आवारात करावी

### शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांची मागणी

माजलगाव (प्रतिनिधी)
(प्रतिनिधी)

यावर्षीच्या खरीप हंगाम काढणीला लवकरच सुरुवात होणार असून नाफेड,एफ.सी.आय.आणि सी.सी.आय.यांच्यातर्फे आधारभूत किमतीने करण्यात येणारी तेलवर्गीय,डाळवर्गीय,अन्नधान्य, आणि कापूस आदि.शेतीमालाची खरेदी बाजार समितीच्या आवारातच करावी.अशी मागणी शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष आणि भारतीय किसान संघ-परिसंघ नवी दिल्लीचे सचिव कालिदास आपेट यांनी केली आहे.



बाजार समिती कायद्यातील कलम ३२-ड अन्वये शेतीमालाला आधारभूत किंमत मिळवून देणे हे बाजार समितीचे कर्तव्य आहे.बाजार समितीच्या आवारात शेतीमालाची आवक होताना मुख्य प्रवेशद्वारावर इलेक्ट्रॉनिक वजन काट्याद्वारे शेतीमालाचे वजन करून शेतकऱ्याला शेतीमालाच्या वर्णना सहित आवक पावती देणे बंधनकारक आहे. त्यानंतर बाजार समितीने शेतीमालाची क्लिनिंग, ग्रेडिंग करून शेतीमाल स्वच्छ करून घेणे ही बाजार समितीची जबाबदारी आहे. त्यानंतर बाजार समितीच्या सचिव,तालुका कृषी अधिकारी आणि सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांनी शेतीमालाची प्रतवारी ठरविणे (एफ.ए.क्यू.दर्जा) आवश्यक आणि बंधनकारक आहे. अशी कायदेशीर प्रक्रिया करून शेतीमालाचे लिलाव करणे बाजार समितीकडून अपेक्षित आहे.

मागील दहा वर्षापासून महाराष्ट्रातील बाजार समित्यांमध्ये केवळ 'मार्केट फी' गोळा करण्याचा गोरख धंदा सुरू आहे. बाजार समितीच्या आवारात देशी दारूची दुकाने, कपडे धुण्याचे दुकान, रासायनिक खत, बियाणे, कीटकनाशके विक्रीची दुकाने, सिमेंट,बांधकाम साहित्य विकणारे, पतपेढ्या, मल्टीस्टेट, फायनान्स, टायरची दुकाने, फटाके, बिअर बार, हॉटेल,किराणा माल, घरगुती भांडी, कापड,मेडिकल, हेअर कटिंग सलून अशी विविधांगी दुकाने थाटली आहेत. केवळ पोट भाडेकरू ठेवून किराया वसूल करण्याचा धंदा बाजार समितीच्या मार्फत केला

## राज्यस्तरीय वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीच्या बैठकीचे उद्घाटन

### समाजाच्या शेवटच्या घटकाच्या विकासासाठी

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

सामाजिक न्याय विभाग हा समाजातील तळागाळातील घटकांच्या कल्याणासाठी कार्यरत असलेला शासनाचा महत्त्वाचा विभाग आहे. या विभागाने हाती घेतलेल्या समाज हिताच्या विविध योजना आणि उपक्रम समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रसारमाध्यमांची साथ अत्यावश्यक असल्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले. समाज कल्याणासाठी योगदान देणाऱ्या पत्रकारांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे त्यांनी यावेळी जाहीर केले.




### सामाजिक न्याय विभागाच्या योजनांच्या अंमलबजावणीत पत्रकारांचा सहभाग घ्यावा: यदु जोशी

सामाजिक न्याय आणि इतर मागास बहुजन कल्याण विभाग समाजातील मोठ्या घटकांच्या कल्याणासाठी कार्यरत आहेत. शासनाच्या प्रतिमानिर्मितीत या विभागांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामुळे या विभागांच्या योजनांची प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. यासाठी विभागीय स्तरावर स्वतंत्र समिती स्थापन करून त्यात पत्रकारांचा सहभाग घेतल्यास योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावी होईल, असे महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदु जोशी यांनी सांगितले. तसेच, अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांच्या कल्याणासाठी योगदान देणाऱ्या पत्रकारांना दरवर्षी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्याचा निर्णय घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे छत्रपती संभाजीनगर येथे महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीच्या दोनदिवसीय बैठकीचे उद्घाटन आज पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इतर मागास बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे होते. यावेळी आमदार प्रशांत बंब, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीचे

# ३२ टक्के आरक्षणातील सर्व प्रवर्ग रद्द करा: मनोज जरांगे पाटील



बीड : राज्य सरकारने ओबीसी प्रवर्गातून मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय घेतल्यानंतर ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी या निर्णयाला कडाडून विरोध केला आहे. ओबीसींच्या आरक्षणाचे रक्षण करण्यासाठी लढा देणार असल्याची भूमिका भुजबळांनी घेतली. त्यावरून आता मराठा आरक्षण चळवळीचे नेते मनोज जारंगे पाटील यांनी जालना येथे पत्रकारांशी बोलताना भुजबळांवर तीव्र शब्दांत टीका केली.

जारंगे यांनी भुजबळांच्या वक्तव्याला प्रत्युत्तर देताना सांगितले की, तुम्ही म्हणता की आमच्या दबावामुळे मराठा नेते बोलत नाहीत, पण खरे म्हणजे आम्ही एकमेकांचा मान राखतो. तुम्ही फक्त गैरसमज पसरवण्याचे काम करता. आम्ही कुणावरही दबाव आणलेला नाही. पुढे बोलताना जारंगे म्हणाले की, तुम्ही म्हणाला होता की अराजक थांबेल, पण त्यानंतरच मराठा नेत्यांची वाणी थंडावली. अराजक घडवणारे तुम्हीच होतात, दंगली घडवल्यात त्या तुमच्या लोकांनीच. आमचे मराठा नेते निरुपयोगी किंवा विघातक नाहीत, जातीयवादाचे राजकारण करणारे तुम्ही आहात.यावेळी त्यांनी ३२ टक्के आरक्षणातील सर्व प्रवर्ग रद्द करण्याची मागणी केली. ओबीसींमध्ये मराठ्यांसह ६० टक्के लोकसंख्या आहे. त्यामुळे ३२ टक्के आरक्षण खुल्या स्वरूपात ठेवले पाहिजे. वेगवेगळे प्रवर्ग करून आरक्षण विभागण्याची गरज नाही. आमच्याकडे पुरावे आहेत, तुमच्याकडे नाहीत, अशा शब्दांत जारंगे पाटलांनी भुजबळांना लक्ष्य केले.

# ४५९६ शिक्षकांनाच्या कार्यमुक्तीचे आदेशावर सीईओंची मोहोर

बीड (प्रतिनिधी ) :

जिल्ह्यातील ४५९६ शिक्षकांना कार्यमुक्तीचे आदेश देण्यात आले असून मात्र, कार्यमुक्ती मिळूनही संबंधित शिक्षकांना तत्काळ नव्या शाळेत रुजू होता येणार नाही. २२ सप्टेंबरनंतरच ते नवीन कार्यस्थळी जॉईन होऊ शकणार आहेत.

गेल्या आठवड्यात ऑनलाइन बदली झालेल्या शिक्षकांच्या कार्यमुक्तीसंदर्भात मोठी हालचाल सुरू होती. ज्या जिल्ह्यांत सातव्या टप्प्यातील बदली नाही, तेथून आलेल्या शिक्षकांच्या कार्यमुक्तीबाबतचे प्रस्ताव शिक्षण विभागाने सर्वसाधारण प्रशासन विभागाकडे पाठवले होते. त्यावर अंतिम शिक्कामोर्तब गुरुवारी सीईओंनी केले.



तथापि, शिक्षकांच्या तक्रारी व त्यासंदर्भातील पाच शिक्षक व दोन तक्रारदारांचे निवेदन या कालावधीत ऐकले जाण्याची शक्यता असल्याने रुजू होण्यात विलंब होत आहे. त्यामुळे शिक्षकांनी अद्याप संयम बाळगावा, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील शिक्षक बदली प्रक्रियेत एक महत्त्वाचे पाऊल पुढे पडले असले तरी प्रत्यक्ष रुजू होण्यासाठी अजून थोडा अवधी लागणार आहे.

२२ सप्टेंबरनंतर शिक्षक रुजू होतील बदली झालेल्या शिक्षकांना कार्यमुक्त करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची परवानगी मिळाली आहे. परंतू काही कारणांमुळे संबंधित शिक्षकांना २२ सप्टेंबरनंतर रूजू होण्याबाबत सूचना देण्यात येणार आहे.भगवान फुलारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बीड

# बीडचे भूमिपुत्र ,गणेश खरात यांना राज्यस्तरीय मराठवाडा रत्न पुरस्कार घोषित

वडवणी ।प्रतिनिधी

मराठवाडा सेवक प्रतिष्ठानच्या वतीने यंदाचा ७७ व्या मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त दिला जाणारा राज्यस्तरीय मराठवाडा रत्न २०२५ पुरस्काराचे मानकरी बीडचे जय मातादी कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपर्स बीड पुणे चे ओनर तथा उद्योजक आणि शैक्षणिक क्षेत्रामध्ये भरारी घेणारे गोरगरीब जनतेला न्याय मिळवून देणारे,बीडचे भूमिपुत्र श्री गणेश खरात यांना दिला जाणार आहे. या पुरस्कार सोहळ्याचे वितरण १७ सप्टेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता, यशवंतराव चव्हाण नाट्यगृह कोथरूड रोड पुणे येथे ह. भ. प. गुरुबाबा औसेकर महाराज लातुर यांच्या शुभहस्ते तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री व्यंकटराव गायकवाड, सचिव जलसंपदा विभाग महाराष्ट्र राज्या, तसेच प्रमुख पाहुणे म्हणून अतिरिक्त आयुक्त मनपा पुणे चे



पृथ्वीराज बी.पी. इत्यादी उपस्थित राहणार आहेत,

या विषयी अधिक माहिती अशी की, दरवर्षी मराठवाडा सेवक प्रतिष्ठान तर्फे १७ सप्टेंबरला मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा केला जातो, या कार्यक्रमाच्या माध्यमातून मराठवाड्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांना राज्यस्तरीय मराठवाडा रत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येतो, या अनुषंगाने बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र तथा जय मातादी कन्स्ट्रक्शन बीड व पुणेचे ओनर ,औद्योगिक व शैक्षणिक क्षेत्रात भरारी घेत सर्वसामान्य जनतेच्या मदतीला धावून जाणारे, सामाजिक कार्यकर्ते श्री.गणेशराव खरात यांना २०२५ चा राज्यस्तरीय मराठवाडा रत्न पुरस्कार देऊन त्यांच्या कर्तुत्वाचा सन्मान केला , दिनांक १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती दिनाचे औचित्य साधून,यशवंतराव चव्हाण नाट्यगृह कोथरूड रोड पुणे येथे विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थित हा सोहळा संपन्न होणार आहे, पुरस्कार जाहीर होताच बीड शहरात गणेश खरात यांच्या समर्थकांनी दिवाळी साजरी करत ,पेढे वाटत, प्रत्यक्ष व भ्रमितध्वनी द्वारे त्यांचा सन्मान करून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला.

# खो-खो स्पर्धेत वाघाळा येथील श्री संत भगवान बाबा निवासी प्रा. आश्रमशाळा प्रथम विजेता

## अध्यक्ष फुलचंदराव कराड यांनी केले विजयी संघाचे विशेष कौतुक

परळी (प्रतिनिधी)

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत सलग चौथ्या वर्षीही वाघाळा येथील श्री संत भगवान बाबा प्राथमिक निवासी आश्रम शाळेच्या मुलीच्या संघाने विजेता पद पटकावले असुन सलग चौथ्या वर्षीही वर्चस्व कायम ठेवल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री फुलचंदराव कराड यांनी या संघाचे विशेष कौतुक केले आहे.

श्री संत भगवान बाबा प्राथमिक निवासी आश्रम शाळा वाघाळा या शाळेतील मुलींच्या खो-खो संघाने तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत आपले गेल्या तीन वर्षापासूनचे वर्चस्व कायम ठेवत सलग चौथ्या वर्षीही विजेतेपद पटकावून घवघवीत यश संपादन केले.




या संघाची आता जिल्हास्तरीय खो खो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या शाळेच्या क्रीडा विभागाने व सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी अतिशय मेहनतीने विजयाची ही घोडदौड सलग चौथ्या वर्षीही कायम ठेवली असून याचा आपल्याला अभिमान असल्याचे विशेष कौतुक संस्थेचे अध्यक्ष फुलचंदराव कराड यांनी केले आहे. मुलींच्या संघाने या स्पर्धेत सलग चौथ्या वर्षी तालुकास्तरीय यश मिळवल्याबद्दल सर्व विजेत्या खेळाडू, क्रीडा शिक्षक बेंबडे वाय. जी.,फड एन.ए., आरसुळे एच. एस. यांचेही फुलचंदराव कराड यांनी अभिनंदन केले आहे. शाळेचे मुख्याध्यापक पुंडकरे डी.व्ही. व सर्व शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सातत्याने अशा प्रकारची शैक्षणिक प्रगती साधावी अशी अपेक्षाही अध्यक्ष फुलचंदराव कराड यांनी व्यक्त करून विजयी संघाला जिल्हास्तरीय स्पर्धेसाठीही भरभरून शुभेच्छा दिल्या आहेत.

# पप्पू गायकवाड यांच्या जन आक्रोश महामोर्चाने प्रशासनाची उडाली झोप

गेवराई ।प्रतिनिधी

शोषित पीडित वंचितांच्या विविध प्रश्नांचा निपटारा करण्याच्या हेतूने गेवराई तालुका वंचित बहुजन आघाडी गेवराई तालुक्याच्यावतीने तालुका अध्यक्ष पप्पु गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली गेवराई तहसीलवर जन आक्रोश महामोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. आंदोलनात मोठा जनसमुदाय पाहून प्रशासनाला घाम फुटला मागण्यात तात्काळ या लवकर मान्य न झाल्यास पुन्हा रस्त्यावर उतरून मोठे जन आंदोलन करण्यात येईल अशे यावेळी जनसामान्यांचे नेतृत्व पप्पू गायकवाड यांनी रोख ठोक मेक ठोकून प्रशासनाच्या नाकात दम आणला. यावेळी मोठा जन समुदाय या मोर्चात सहभागी झाल्याने प्रशासन हवालदिल झाले होते.

यावेळी वंचित बहुजन आघाडी महाराष्ट्र राज्य महासचीव प्रा.किसन चव्हाण म्हणाले की पंडीत,पवार केवळ दलित, मुस्लिम, ओबीसी, आदिवासी यांचे मते घेण्यासाठी वाडी-वस्ती तांड्यावर, पाड्यावर येतात परंतु या लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी फक्त वंचित बहुजन आघाडी व वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आंदोलन, मोर्चा काढू मार्गी लावतात त्यामुळे जणतेने देखील पुढील काळात जो आपले प्रश्न मार्गी लावतो,जो आपल्या आडचनीवेळी खंबीरपणे सोबत राहतो त्याच वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना मते दिली पाहिजेत.

जन सुरक्षा विधेयक तात्काळ रद्द करण्यात यावे, गायरान जमीन सातबारा लावून देणे, गावठाण जमिनीवरील अतिक्रमण कायमचे करून पीटर देणे, घरकुलधारकाकडून सरपंच ग्रामसेवक यांच्याकडून होत असलेली पैशाची मागणी तात्काळ बंद करण्यात यावी, विधवा निराधार यांच्या पगारी पूर्वत करून रखडलेले अर्ज तात्काळ मार्गी लावण्यात यावेत या विविध मागण्यांकरिता वंचित बहुजन आघाडी महाराष्ट्र राज्य महासचिव तथा बीड जिल्हा प्रभारी किसन चव्हाण व बीड जिल्हा अध्यक्ष अजय सरवदे



यांच्या मार्गदर्शनाखाली पप्पू गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली गेवराई तहसीलवर भव्य अशा जन आक्रोश महामोर्चाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी महाराष्ट्र राज्य तक्रार निवारण समितीचे अध्यक्ष तथा बीड लोकसभा २०१९ चे उमेदवार प्रा.विष्णु जाधव,धम्माभाऊ साळवे ,खंडु जाधव, राजेंद्र पोकळे, सुदेश पोदार, संदीप रोकडे, किरण वाघमारे,सचिन मेघडंबर, बाळासाहेब गायकवाड, किशोर भोले,रेवन गायकवाड, ज्ञानेश्वर हवाले,

जोपर्यंत प्रशासकिय अधिकारी आंदोलन स्थळी येवुन लेखी आश्वासन देत नाही तोपर्यंत जागचे हलनार नाही अशी भुमिका घेतल्यावर तहसिलदार खोमने यांनी बैठक आटपती घेत ना.तहसिलदार यांच्यापाशी लेखी पत्रक देऊन तहसिल संबंधित कामे एका महिन्यात मार्गी लावु असे लेखी आश्वासन दिले,लगेचच गेवराई पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी पंचायत समिती अंतर्गत येणारे मागण्यातील सर्व प्रश्न मार्गी लावु असे आश्वासन दिल्यानंतर जनाक्रोश आंदोलन मागे घेण्यात आले.

# इद ए मिलाद उन् नबी निमित्त पात्रुड येथे गरजु विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



रिपब्लिकन सेना युवा तालुकाध्यक्ष सय्यद अन्वर यांचा स्तुत्य उपक्रम

माजलगाव ।प्रतिनिधी

शेख अखिल इद ए मिलाद उन् नबीच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील पात्रुड येथे गरजु व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. रिपब्लिकन सेनेचे युवा तालुकाध्यक्ष सय्यद अन्वर भाई रफियोद्दीन यांनी दिनांक ११ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा व जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळेतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना आवश्यक शालेय साहित्य प्रदान करून एक सामाजिक बांधिलकी जपणारा स्तुत्य उपक्रम राबविला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामपंचायत पात्रुडच्या सरपंच नौशाद लतीफ मोमीन यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून रिपब्लिकन सेना बीड जिल्हाध्यक्ष विजयदादा साळवे, ग्राम विकास अधिकारी भागवत भुजबळ उपस्थित होते. याशिवाय विशेष उपस्थितीत शेख युसूफ (अध्यक्ष, नवनियुक्त तंटामुक्त समिती), बाळासाहेब बनकर (ग्रामपंचायत सदस्य), मोइज चौधरी (ग्रामपंचायत सदस्य), सय्यद नाजेर भाई, शेख रफीक हाफेजसाब, समियोद्दीन अन्सारी (व्यवस्थापन समिती अध्यक्ष), मोनीन अन्सारी यांसह पत्रकार प्रकाश यादव, शेख राजु, सय्यद जकिर, पठान निसार, जिलानी कुरेशी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वजीर मॅडम यांनी केले,

प्रास्ताविक पठाण मोहसीन सर (केंद्र मुख्याध्यापक, पात्रुड) यांनी केले तर आभार प्रदर्शन धपाटे सर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी उर्दू व मराठी माध्यमातील सर्व शिक्षक व ट्रेनी शिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभले. हा उपक्रम शिक्षणाची गोडी वाढविण्यासोबतच गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरला. समाजाच्या विकासासाठी व शिक्षण प्रसारासाठी रिपब्लिकन सेना युवा तालुकाध्यक्ष सय्यद अन्वर यांचे योगदान प्रेरणादायी आहे.

# युरियायुक्त गवत खाल्याने तीन मेंढयांचा मृत्यू

## जिंतूर तालुक्यातील इटोली शिवारातील घटना



जिंतूर /प्रतिनिधी

जिंतूर तालुक्यातील इटोली शिवारातील साईनगर तांडा परिसरात अज्ञात व्यक्तीने युरियायुक्त मिठ शासकियगायरान शेतात टाकल्याने त्या परिसरात मेंढया चरत असतांना तीन मेंढयांचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी (दि.०९ सप्टेबर ) सकाळी उघडकीस आली. या प्रकरणी जिंतूर पोलिसात अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चिमाजी हाके यांनी तक्रार दिली आहे. त्यांचा गडी नेहमीप्रमाणे मेंढया चराईसाठी घेऊन गेला असता साईनगर तांडा परिसरात अज्ञात व्यक्तीने गायराणावर जमीनीवर युरीयायुक्त मिठ पसरून दिले असल्याने तीन मेंढयांनी ते खाल्यामुळे तीन मेंढया दगावल्या. यात चिमाजी हाके यांना ५० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. या प्रकरणी जिंतूर पोलिसात अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस हवालदार वाघमारे करत आहेत.

# दिलेल्या आश्वासना प्रमाणे एक महिन्यात संपूर्ण प्रश्न मार्गी न लावल्यास पुन्हा आंदोलन करु :-प्रा.किसनं चव्हाण

गेवराई (प्रतिनिधी)

तालुक्यातील शोषित पीडित वंचितांच्या विविध प्रश्नांचा निपटारा करण्याच्या हेतूने गेवराई तालुका वंचित बहुजन आघाडी गेवराई तालुक्याच्यावतीने तालुका अध्यक्ष पप्पु गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली गेवराई तहसीलवर जन आक्रोश महामोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी वंचित बहुजन आघाडी महाराष्ट्र राज्य महासचीव प्रा.किसन चव्हाण म्हणाले की पंडीत,पवार केवळ दलित, मुस्लिम, ओबीसी, आदिवासी यांचे मते घेण्यासाठी वाडी-वस्ती तांड्यावर, पाड्यावर येतात परंतु या लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी फक्त वंचित बहुजन आघाडी व वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आंदोलन, मोर्चा काढू मार्गी लावतात त्यामुळे जणतेने देखील पुढील काळात जो आपले प्रश्न मार्गी लावतो,जो आपल्या आडचनीवेळी खंबीरपणे सोबत राहतो त्याच वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना मते दिली पाहिजेत.

जन सुरक्षा विधेयक तात्काळ रद्द करण्यात यावे, गायरान जमीन सातबारा लावून देणे, गावठाण जमिनीवरील अतिक्रमण कायमचे करून पीटर देणे, घरकुलधारकाकडून सरपंच ग्रामसेवक







यांच्याकडून होत असलेली पैशाची मागणी तात्काळ बंद करण्यात यावी, विधवा निराधार यांच्या पगारी पूर्वत करून रखडलेले अर्ज तात्काळ मार्गी लावण्यात यावेत या विविध मागण्यांकरिता वंचित बहुजन आघाडी महाराष्ट्र राज्य महासचिव तथा बीड जिल्हा प्रभारी किसन चव्हाण व बीड जिल्हा अध्यक्ष अजय सरवदे यांच्या मार्गदर्शनाखाली पप्पू गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली गेवराई तहसीलवर भव्य अशा जन आक्रोश महामोर्चाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी महाराष्ट्र राज्य तक्रार निवारण समितीचे अध्यक्ष तथा बीड लोकसभा २०१९ चे उमेदवार प्रा.विष्णु जाधव,धम्माभाऊ साळवे ,खंडु जाधव, राजेंद्र पोकळे, सुदेश पोदार, संदीप रोकडे, किरण वाघमारे,सचिन मेघडंबर, बाळासाहेब गायकवाड, किशोर भोले,रेवन गायकवाड, ज्ञानेश्वर हवाले,

जोपर्यंत प्रशासकिय अधिकारी आंदोलन स्थळी येवुन लेखी आश्वासन देत नाही तोपर्यंत जागचे हलनार नाही अशी भुमिका घेतल्यावर तहसिलदार खोमने यांनी बैठक आटपती घेत ना.तहसिलदार यांच्यापाशी लेखी पत्रक देऊन तहसिल संबंधित कामे एका महिन्यात मार्गी लावु असे लेखी आश्वासन दिले,लगेचच गेवराई पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी पंचायत समिती अंतर्गत येणारे मागण्यातील सर्व प्रश्न मार्गी लावु असे आश्वासन दिल्यानंतर जनाक्रोश आंदोलन मागे घेण्यात आले.

# बीड जिल्ह्यात ७०० ते ८०० बेकायदेशीर व अपूर्ण लिफ्ट बसविल्याचा आरोप

बीड जिल्ह्यातील गैर कानुनी ७०० ते ८०० लिफ्टचे चुकीच्या पध्दतीने बसविण्यात आलेले आहेत. त्यामध्ये काही लिफ्टला १) एमरजन्सी रिस्की डिव्हाईस बसविलेले नाहीत. रिस्की डिव्हाईसचे काम लाईट गेल्यानंतर लिफ्ट एका फ्लोअरला सोडते. २) लिफ्टच्या वर सेफ्टी बॅरिकेट बसविलेले नाहीत. ३) मोटरला एमरजंन्सी ब्रेक बसविलेले नाहीत. एमरजंन्सी ब्रेकचे काम लिफ्ट अडकल्याच्या नंतर त्याचा वापर केला जातो. ४) लिफ्टला चक्कर प्लेट बसविलेली नाही. लिफ्टच्या चक्कर प्लेटचे काम सेफ्टी नाही. ५) लिफ्टला खड्ड्यामध्ये जी सेफ्टी असते ते बफर स्प्रिंग बसविलेली नाही. ६) बीड जिल्ह्यातील देखभाल दुरूस्तीचे रेकॉर्ड जिल्ह्यातील अधिकाऱ्यांकडे उपलब्ध नाही. ७) नवीन लिफ्टला परवानगी देण्याची जागेवर जाऊन वार्षिक तपासणी करण्याची जबाबदारी ऊर्जा विभागाच्या अंतर्गत असते. परंतु बीड मधील कोर्ट तसेच हॉस्पिटल जिल्ह्यातील सरकारी ऑफीस, कार्यालय, घरगुती बिल्डींग्स, अपार्टमेंट बीड मधील या सर्व जागेत चुकीच्या पध्दतीने लिफ्टचे अर्धवट कामे करून लिफ्ट बसविण्यात आलेले आहेत व जिल्ह्यातील सर्व लिफ्ट धारकांना लिफ्टचे डुप्लीकेट परवाने काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व ठेकेदारांनी दिले आहेत..





यामध्ये लिफ्ट अचानक बंद पडली व काही दुर्घटना घडली तर याला जबाबदार कोण? दि. ०३/०८/२०२५ रोजी शिवाजीराव हार्ड केअर ॲण्ड इमेजिंग सेंटर बीड या हॉस्पिटलमध्ये मराठा योध्दा मा. मनोज (दादा) जरांगे पाटील यांच्यासोबत या हॉस्पिटलच्या लिफ्टमध्ये दुर्घटना घडली होती. त्यामध्ये जर लिफ्टचे पूर्णपणे काम व्यवस्थित केलेले असते तर अशा होणाऱ्या लिफ्टमध्ये होणाऱ्या दुर्घटना घडल्या नसत्या. शिवाजीराव हार्ड केअर ॲण्ड इमेजिंग सेंटर बीड या हॉस्पिटलचे लिफ्टचे लाईसन्स नसून सुध्दा लिफ्ट चालू आहे. या निष्काळजीपणाला कोणते अधिकारी व ठेकेदार जबाबदार कोण?

बीड जिल्ह्यामध्ये ३०० ते ४०० लिफ्ट चुकीच्या पध्दतीने अर्धवट कामे करून बसविलेले आहेत व त्यामध्ये प्रत्येक लिफ्ट धारकाला कलर झेरॉक्स काढून डुप्लीकेट लाईसन्स दिले आहेत. यामध्ये हा सर्वकाही चुकीच्या पध्दतीचा पैशाचा लुटमारी कारभार या बीड जिल्ह्यातील वरीष्ठ अधिकाऱ्यांसोबत मिळून केला आहे. बीड जिल्ह्यामध्ये सरकारी ऑफीस कार्यालय, सर्व हॉस्पिटल्स, घरगुती बिल्डींस व अपार्टमेंट या जागेत ज्या काही लिफ्ट बसविलेल्या आहेत. त्या प्रत्येक लिफ्टची पाहणी करून व त्या प्रत्येक लिफ्ट धारकाचे लायसन्स व्हेरीफाय करून ते ओरिजनल आहेत की डुप्लीकेट पाहण्यात यावेत व ज्या लिफ्टधारकाचे काम अपूर्ण व लायसन्स नाहीत त्या लिफ्ट तात्काळ बंद करण्यात याव्यात व बीड जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी व ठेकेदार यांच्यावर तात्काळ कार्यवाही करून या ठेकेदारांची लायसन्स रद्द करण्यात यावेत व यांच्या अर्धवट कामामुळे लिफ्ट मध्ये होणाऱ्या दुर्घटना टळतील ही मा. साहेबांना विनंती.

स्वप्नील महादेव वरपे – मो.नं.९१४६२६७८४८

# राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा





लातूर : महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटना, लातूर जिल्हा यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण समारंभ २०२५ उत्साहात पार पडला. या समारंभात राज्यभरातील विविध जिल्ह्यांतील निवडक शिक्षकांचा गौरव करून त्यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमात बीड जिल्ह्याचा मान उंचावणारी निवड झाली. सर सय्यद अहमद खान उर्दू प्राथमिक शाळा, बीड येथील शिक्षक मोमिन मोहम्मद तौसीफ मोहम्मद मोईनुद्दीन यांना त्यांच्या उत्कृष्ट शैक्षणिक कार्यासाठी व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासातील योगदानाबद्दल राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आला.

शिक्षक मोमिन यांचा सन्मान झाल्यानंतर शाळेचे सचिव शेख अब्दुल वकील सर यांनी या यशाबद्दल पालक व स्थानिक नागरिकांचे अभिनंदन केले. समारंभात शिक्षकांच्या योगदानामुळे विद्यार्थ्यांच्या घडणीत होत असलेल्या सकारात्मक बदलांचा विशेष उल्लेख करण्यात आला.

# पांडुरंग गाडे आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

कडा ।प्रतिनिधी

वर्धमान महावीर चॅरिटेबल ट्रस्ट संचलित महावीर इंग्लिश स्कूल कडा या सीबीएसई बोर्ड मान्यता प्राप्त शाळेचे चित्रकला शिक्षक श्री. पांडुरंग गाडे गेली १३ वर्षापासून अत्यंत प्रामाणिकपणे या संस्थेत काम करत आहे .त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना बीड जिल्हा सीबीएसई सहोदया स्कूल्स कॉम्प्लेक्सचा जिल्हास्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला होता त्याचे वितरण शुक्रवार दिनांक १२ सप्टेंबर २०२५ रोजी मोठ्या दिमाखात मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानपूर्वक करण्यात आले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राध्यापिका स्नेहलताई पाठक (अध्यक्ष संस्कार भारती देवगिरी विभाग) त्याच बरोबर




प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अर्चना पवार , डॉ. सुशिल लोढा, प्रा . अन्वर शेख आणि प्रा. शितल सर्वज्ञ इ . मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष- श्री अमितजी राठोड, उपाध्यक्ष- श्री. संदिपजी चानोदीया, सचिव - श्री. हेमंतजी मेहेर, कोषाध्यक्ष- श्री डॉ. प्रमोदजी भळगट तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी यांनी अभिनंदन केले आहे.





# महेबूब सुभानी दर्गा येथील फेवर ब्लॉग च्या साधी मधून गवत येत आहे

नगर परिषद बांधकाम विभागाचे दुर्लक्ष का होत आहे?

गेवराई ।प्रतिनिधी

शहरात काही महिन्यापूर्वी मोमीनपुरा येथे महेबूब सुभानी दर्गा येथे नगरपरिषद अंतर्गत सुशुभिकर्णाचे काम करण्यात आले होते या कामांमध्ये सदर दर्ग्याची भिंतीला प्लास्टर करून आणि दर्ग्याच्या मोकळ्या जागेवर फेवर ब्लॉक लावण्याची काम करण्यात आले होते परंतु हे काम निष्कृष्ट दर्जाचे झाले असून नगरपालिकेच्या बांधकाम विभागाचे अधिकारी फक्त टक्केवारी घेऊन थातुरमातुर काम करून घेत आहे या टक्केवारी मुळे काम हे निशकृष्ट दर्जाचे होत आहे या भागातील या दर्ग्याला मानणारे लोकांनी नगर परिषद येथे तोंडी तक्रार दिली सदर दर्ग्या कडे नगर परिषद चे बांधकाम विभागणी पाहणी करून काम चागले करून घेण्याची मागणी केली आहे.

# वडवणी तालुक्यातील शिवसेना शिंदे गटाची कार्यकारणी जाहीर

वडवणी ।प्रतीनिधी

शिवसेना शिंदे गट वडवणी तालुका प्रमुख माऊली गोंडे यांनी तालुक्यातील इतर कार्यकारणी व जिल्हा परिषद कार्यकारणी तयार केली असून त्यांना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप व इतरांच्या हस्ते बीड येथे नियुक्तीपत्र देण्यात आले आहेत.

गेल्या दोन महिन्यापूर्वी माऊली गोंडे यांची शिवसेना ( शिंदे गट) वडवणी तालुकाप्रमुख पदी निवड झालेली असुन त्यांनी वडवणी तालुक्यात शिवसेनेचे नवचैतन्य निर्माण केले आहे त्यांनी अवघ्या दोन महिन्यात लोकांशी जनसंपर्क वाढवून तालुक्यातील प्रत्येक गावात जाऊन आणि तालुका कार्यकारणी व जिल्हा परिषद सर्कल कार्यकारणी करण्यासाठी माननीय जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांना शिफारस केली व काल शनिवार रोजी त्यांच्या शिफारशीनुसार खालील प्रमाणे वडवणी तालुक्यात नियुक्तीपत्राचे वाटप माननीय अनिल दादा जगताप



जिल्हाप्रमुख, स्वप्नील भैय्या गलधर,रविराज बडे यांच्या हस्ते करण्यात आले सदरील नियुक्तीपत्र देताना संदीप माने रामदास भाई ढगे व इतर माजी पदाधिकारी उपस्थित होते पुढील प्रमाणे नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत बालासाहेब बादाडे ( उपतालुका प्रमुख), प्रकाश पवार (उपतालुकाप्रमुख) , प्रताप मात्रे (उपतालुकाप्रमुख ) , महादेव मस्के (तालुका सचिव) , शिवाजी सावंत (तालुका समन्वयक ) , बालासाहेब शेंडगे( तालुका संघटक ) बाळनाथ घाटुळ (उपळी जिल्हा परिषद सर्कल प्रमुख), कृष्णा कोळपे ( उपळी पंचायत समिति प्रमुख) ,ज्ञानेश्वर मोरे ( कवडगांव पंचायत समिती प्रमुख), आनंत देवडकर ( कवडगांव पंचायत समिती उपप्रमुख), राजेभाऊ कदम (जिल्हा परिषद सर्कल प्रमुख चिखलबीड सर्कल ), सिद्धेश्वर ताटे ( चिखलबीड पंचायत प्रमुख ),गोरख चव्हाण (चिखलबीड पंचायत समिती, उपप्रमुख),अशोक राठोड( चिंचवन पंचायत समितप्रमुख),शिवाजी चव्हाण (चिंचवन पंचायत समिती उपप्रमुख) करण शिंदे उपशहरप्रमुख वडवणी शहर वरील पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप व तालुकाप्रमुख माऊली गोंडे, रामदास भाई ढगे संदिप माने यांनी नवनियुक्त

# ब्रम्हगावात आयुष्यमान कार्डचे वाटप

## अनिलराधे मित्र मंडळाचा वतीने उपक्रम राबविण्यात आले

माजलगाव ।प्रतीनिधी

राज्यातील जनतेकरिता मोफत पाच लाख रूपयांच्या उपचारासाठी गरजेचे असलेल्या आयुष्यमान कार्डचा कॅम्प घेवुन त्याचे वाटप दि. १२ सप्टेंबर २०२५ रोजी ब्रम्हगावात उपसरपंच अनिलराधे कांबळे यांचा मुलगा साम्राज्य अनिल कांबळे याच्या वाढदिवसानिमीत्त ५२०.आयुष्मान कार्ड वाटत करण्यात आले. शहरापासुन जवळच असलेल्या ब्रम्हगाव येथील अनिलराधे मित्र मंडळाच्या वतीने विवीध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जाते तर महापुरूष जयंती, पुण्यतिथी देखिल साज-या केल्या जातात. उपसरपंच अनिल राधे कांबळे यांचा मुलगा साम्राज्य अनिल कांबळे याच्या व्दितीय



वाढदिवसानिमीत्त हार, तुरे, केक व इतर खर्चाला फाटा घेत गावातील सर्व ग्रामस्थांकरिता आयुष्यमान कार्ड काढण्याकरिता ऑनलाईन कॅम्प घेवुन ग्रामस्थांना तात्काळ कार्डचे वाटप करण्यात आले. यावेळी उपसरपंच अनिलराधे कांबळे यांचेसह विक्रांत कांबळे, संकेत कांबळे, श्याम कांबळे, शरद कांबळे, यवराज कांबळे, प्रविण कांबळे, अविनाश कांबळे, तात्यासाहेब कांबळे, सागर कांबळे, सिध्देश्वर कांबळे, मयूर कांबळे यांचेसह ग्रामस्थांची उपस्थिती होती. दरम्यान आयुष्यमान कार्ड मिळाल्यामुळे ग्रामस्थांच्या चेह-यावर समाधान दिसुन आले तर त्यांना मिळालेल्या आयुष्यमान कार्डमुळे उपचार मिळणे सोपे झाले आहे.

# अशोक दादा ढोले पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त मतिमंद विद्यालयात शालेय साहित्य आणि अल्प उपहार वाटप

बीड ।प्रतीनिधी

बीड बार्शी नाका येथील सामाजिक कार्यकर्ते अशोक दादा ढोले पाटील यांच्या वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. वाढदिवसाचा खर्च टाळून, त्यांनी बीड येथील मतिमंद विद्यालयातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य आणि अल्प उपहार वाटप केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आनंद तर मिळालाच, पण समाजातील गरजूंना मदत करण्याची प्रेरणाही इतरांना मिळाली. याप्रसंगी अशोक दादा ढोले पाटील यांनी, वाढदिवस साजरा करण्याचा खरा आनंद




गरजूंना मदत करण्यात आहे, असे सांगितले. तसेच, विद्यार्थ्यांना मदतीचा हात देता आल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले.

यावेळी भावी नगरसेवक सातीराम अण्णा ढोले, समाजसेवक प्रविण भाऊ पालीमकर, सामाजिक कार्यकर्ते अशोक खरसाडे,पत्रकार भागवत वैद्य ,संजय कुलकर्णी , लक्ष्मण नाना गायकवाड,दिव्यांग कर्मचारी संघटनेचे प्रदेशउध्यक्ष अशोक आठवले, रोहित धुंरधरे,सचिन बोबडे,संदिप गांडगे, प्रकाश तावरे,शरद झोडगे, महेश मते,लहु गोरे,अमोल अहिरे, प्रकाश तावरे,अमोल शिंदे,अजय जाधव अंकुश गवळी, विद्यालयाचे शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, आणि इतर मान्यवर उपस्थित होते. ढोले पाटील यांच्या या कार्याबद्दल सर्वांनी त्यांचे कौतुक केले. अशाप्रकारे वाढदिवस साजरा करण्याचा आदर्श समाजापुढे ठेवल्याबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी, विद्यार्थ्यांनी शैक्षणिक साहित्य आणि फळांचे वाटप मिळाल्याने समाधान व्यक्त केले आणि अशोक दादांचे आभार मानले.

# शिर्डी-हैदराबाद महामार्गाची दुर्दशा; खर्डा-जामखेड मार्गावरील नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास

खर्डा ।प्रतीनिधी

शिर्डी-हैदराबाद महामार्ग हा वाहतुकीसाठी महत्वाचा असला तरी खर्डा ते जामखेड या रोडची अक्षरशः चाळणी झाली आहे. महामार्गावरून दररोज हजारो वाहने धावतात. मात्र, ठिकठिकाणी पडलेल्या खोल खड्ड्यांमुळे वाहनचालकांना कसरतीने प्रवास करावा लागत आहे. रस्त्याची ही बिकट अवस्था अपघातांना आमंत्रण देत असून अनेकदा गाड्या घसरून अपघात घडतात. खड्डा चुकवण्याच्या प्रयत्नात चालकांचा जीव धोक्यात घालावा लागत आहे. प्रवाशांचा त्रास दिवसेंदिवस वाढत चालला असून नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

जामखेड हे तालुक्याचे ठिकाण असल्याने दररोज शेकडो वाहने जामखेडकडे धावत असतात. मात्र, मार्गाची झालेली दुरवस्था ही सर्वांसाठी डोकेदुखी ठरली आहे. रस्ता सुधारण्यासाठी तातडीने पावले उचलावीत, अन्यथा मोठ्या अपघातांची मालिका होण्याची भीती नागरिकांनी स्पष्टपणे व्यक्त केली आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की – खड्डेमय रस्त्यामुळे प्रवास असह्य झाला आहे.



संबंधित विभागाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती केली नाही अपघात होण्याची शक्यता आहे

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक मुजमुले नितीन रावण यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभु नगर, नेहरू चौक, परळी वैजनाथ, ता.परळी वै. जि.बीड बीड ता.जि.बीड येथे छापून कार्यालय : घर नं.५०४, बिल्डींग नं.१९६, कानोबा नगर, नाथापुर रोड, जीवनदीप सिनीअर कॉलेज, बीड ता.जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – मुजमुले नितीन रावण